# राजर्षि शाहू सहकारी बँक लि. पुणे

मुख्य कार्यालय : ५९७, शुक्रवार पेठ, शाहू कॉम्प्लेक्स,शिवाजी रोड, पुणे-४११००२ फोन ०२० - २४४३५३८४/२४४३५३८५,
Email - headoffice@rajarshishahubankpune.com, Web Site – rajarshishahubankpune.com

## ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

### केवळ सभासदांसाठी

राजर्षि शाहू सहकारी बँकेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १७ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता **त्रिविक्रम उद्योग समुहाचे सुपर्ण सभागृह, एचडीएफसी बँकेशेजारी, अरण्येश्वर चौक, पर्वती पुणे – ४११००९** येथे खालील विषयांवर कामकाज करण्यासाठी होणार आहे. सदर सभेस आपण अवश्य उपस्थित राहावे ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) दिनांक २२/०९/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) मा.संचालक मंडळाने तयार केलेला सन २०२१–२०२२ या आर्थिक वर्षाचा वृत्तांत, तसेच ३१ मार्च २०२२ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक ताळेबंद, नफा–तोटा पत्रक यास मान्यता देणे.

३) बॅकेच्या संचालकांना व त्यांचे नातेवाईकांना सन २०२१–२०२२ या आर्थिक वर्षात दिलेल्या कर्जाची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम ७५ (२) नुसार माहिती घेणे.

४) मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२१–२०२२ अखेरच्या नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.

५) सन २०२१–२०२२ या वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची माहिती घेणे.

६) मा.अंतर्गत हिशोब तपासनीस व कंकरंट हिशोब तपासनीस यांचेकडून सन २०२१–२०२२ या आर्थिक वर्षाच्या आलेल्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.

७) सन २०२३–२०२४ या वर्षासाठी अंतर्गत हिशोब तपासनीस व कंकरंट हिशोब तपासनीस यांची नेमणूक करणेचे व त्यांचा मुशाहिरा ठरविण्याचे अधिकार मा.संचालक मंडळास देणे.

८) सन २०२२–२०२३ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी शासनमान्य नामतालिकेमधून आपल्या बँकेकरीता वैधानिक लेखापालाची नेमणूक रिझर्व्ह बँकऑफ इंडीया यांच्या परवानगीस अधीन राहून करणे व त्यांचा मुशाहिरा ठरविणे.

९) बँकेच्या पोटनियम दुरूस्तीस मान्यता देणे.

१०) बँकेची धनकवडी शाखेची मे.व्यंकटेश डेव्हलपर्स यांचेकडून खरेदी केलेली पहील्या मजल्यावरील ऑफीस नं.१ क्षेत्र ३४२ चौ.फुट कापरपेट (४२७.५ चौ.फुट बिल्टअप) ही मिळकत विक्रीस मान्यता देणे.

११) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांच्या रजेस मान्यता देणे.

१२) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

**मा.संचालक मंडळाच्या आज्ञेवरून**
**आर.एल.पासलकर,**
मुख्य कार्यकारी अधिकारी

पुणे दिनांक – ०१/०९/२०२२

---

### सूचना

१) गणसंख्ये (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी वरील विषयांवर विचार करण्यासाठी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्यापूर्तीचा नियम लागू होणार नाही.

२) सभासदांना वरील विषयासंबधी काही प्रश्न विचारावयाचे असतील ते त्यांनी लेखी स्वरूपात दि:१०/०९/२०२२ पर्यत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दुपारी २.०० वा.पर्यत बॅकेच्या मुख्य कार्यालयात पाठवावेत.

३) सभासदांनी आपला पत्ता, मोबाईल क्रमांक बदलला असल्यास नजीकच्या शाखेत किंवा मुख्य कचेरीत लेखी कळवावा.

४) वारसाचे नाव नोंदवले नसल्यास नोंदवून घ्यावे.

५) सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षात शालान्त परीक्षा (इयत्ता १० वी व १२ वी च्या) परिक्षेत फक्त सभासदांच्या मुला/ मुलीस ८०% वा त्यापेक्षा जादा गुण मिळाले आहेत त्यांनी दि.१०/०९/२०२२ पर्यत गुणपत्रिकेची झेरॉक्स व सभासदांच्या लेखी अर्जासोबत मुख्य कचेरी किंवा जवळच्या शाखेत द्यावी म्हणजे अशा मुला / मुलींचा गुणगौरव करण्यात येईल.

६) बॅकेचा दि.३१ मार्च २०२२ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद व नफा–तोटा पत्रक बॅकेचे मुख्य कार्यालय व सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे, तो सभासदांनी पोहोच देऊन घेण्यात यावा.

**टीप :– वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थितीचा फॉर्म नोटीसी सोबत पाठविला आहे. सभेस येताना तो बरोबर घेऊन यावा.**